# आरती अबुज बाबांची

आरती चिन्मय सद्गुरुची, अबुज बाबा स्वामींची ।। धृ. ।।

विदेही मूर्ती ठेंगणीशी, पाहण्या दिसे गोजरीशी ।
कामना भक्तांची पुरवी, कल्पवृक्षची हा जेवी ।
धरा भावना, करा पूजना, अर्पा सुमना, करुनि ऐक्यता चित्ताची
ओवाळा आरती प्रेमाची ।। १ ।।

सदोदित जडुनि ध्यानात, व्यवहारी जनासंगे मात ।
पुसल्या दावी वेदांत, प्रेमे गात गुण गुणत ।
भक्तीची मूर्ति, अश्रुची भरती अखंडित नेत्री, समाधी निर्विकल्प ज्याची
सुध ना बुध कैची ।। २ ।।

सगुण साकार रूप धरुनि, पवित्र केली ही धरणी ।
लक्षणे स्थितप्रज्ञाची, गुणातीत असती त्यांची ।
करावा तोल, बोल नव्हे फोल, गोष्ट ही खोल ।
चालेना इथे तार्किकांची, गरज ही शुद्ध भावनेची ।। ३ ।।

आरती गाई प्रभुदास, नमूनि सद्गुरु चरणास ।
पूर्व पुण्य फळा आले, म्हणुनी दर्शन हे झाले ।
खरा हा बाप, जळाले पाप, पळाले ताप, खुंटली शक्ती वाणीची
मिती नाही तव गुणांची ।। ४ ।।

**जय भगवान नंगे बाबा की जय ।**

**सब संतन की जय ।।**